मध्य परिमंडळ २

प्रेसनोट दि. २७/०७/२०२६

# रात्र गस्त दरम्यान गुन्हयातील पाहिजे आरोपीस पिस्तोल व ०६ राउंड सहीत अटक

दि. २७/०७/२०२६ रोजी काळाचौकी पोलीस ठाणे चे गुन्हे प्रकटीकरण पथकास रात्र गस्तीदरम्यान श्रीकांत रेड्डीज रोड, बीएमसी ई वार्ड ऑफिस समोर, रे रोड, मुंबई, ठाकुर गोडावुन या ठिकाणी १० इसम महाराष्ट्र शासनाने प्रतिबंधीत केलेला हुक्का पित असताना मिळून आल्याने त्यांचेवर कारवाई करीत असताना त्यापैकी इसम नामे आरीफ मोहमद आस्लम शेख, वय ३२ वर्षे पत्ता जे.जे. कॉलनी जि विंग रुम नं. ५११, रेकलेमेशन रोड, बांद्रा वेस्ट मुंबई याची अंगझडती घेतली असता त्याच्या अंगझडती मध्ये एक सॅमसंग व एक वन प्लस कंपनीचे मोबाईल तसेच त्याचे आधार कार्ड मिळून आले. तसेच त्याचेकडील बॅगमध्ये खालील वर्णनाचे एक भारतीय बनावटीचे पिस्तुल व ६ जिवंत राऊड मिळून आले आहेत.

०१) २५,०००/- एक भारतीय बनावटीचा अग्नीशस्त्र ( पिस्तोल)- बॅरेलची लांबी १५ से.मी, मुठीची लांबी ८.४ से.मी ( Indian ordnance factories and caliber 7.65 mm) असे त्यावर इंग्रजी मध्ये लिहलेले त्यामध्ये मॅग्झीन असलेले

०२) १२००/- सहा जिवंत राऊंड - पुढील बाजुस निमुळता त्याच्या मागील वर्तुळाकार भागावर kf 7.65 mm असे इंग्रजी मध्ये लिहलेले.

आरीफ मोहमद आस्लम शेख याचेविरुद्ध यापुर्वी शरीराविरुद्ध गंभीर दुखापतीचे अपराधाचे ०८ गुन्हे बांद्रा, विमानतळ पोलिस ठाणे येथे दाखल आहेत. तसेच बांद्रा पोलिस ठाणे येथे विनयभंगाचा ०१ गुन्हा दाखल आहे. सदर आरोपीत सध्या बांद्रा पो. ठाणे येथे दाखल गु.र.क्र. ९१९/२०२६ कलम १०९,११८(१), ११५(२), ३५२,६१,२४८,१११,३(५) बीएनएस अन्वये दाखल गुन्हयातील पाहिजे आरोपीत आहे. सदर आरोपीतावर यापुर्वी ०२ वेळा तडीपारीची देखील कारवाई करण्यात आली आहे.

उपरोक्त नमुद आरोपीताचे ताब्यात विनापरवाना अग्निशस्त्र व जिवंत राउंड मिळून आल्याने तसेच त्याचेविरुदध उपरोक्त प्रमाणे गुन्हे अभिलेख असल्याने त्याचेविरुद्ध काळाचौकी पोलिस ठाणे येथे गु.र.क्र. ३२३/२०२६ शस्त्र अधिनियम १९५९ चे कलम ३,२५ सह कलम ३७(१)(अ), १३५ मपोका अन्वये तसेच इतर सदर आरोपीतासोबत मिळनू आलेल्या इतर ०९ इसमां विरुध्द कोटपा ॲक्ट २००३ चे कलम ४, २१ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून त्याचा तपास सपोनि हसन मुलाणी हे करीत आहेत.

सदरची कामगीरी सदरची कामगीरी मा.पोलीस आयुक्त, श्री देवेन भारती, मा.पोलीस सह आयुक्त, (कायदा व सुव्यवस्था) श्री मनोजकुमार शर्मा, मा.पोलीस सह आयुक्त,(गुन्हे) श्री अनिल कुंभारे , मा.अपर पोलीस आयुक्त, मध्य प्रादेशिक विभाग, मुंबई, श्री विक्रम देशमाने, मा.पोलीस उप आयुक्त, मध्य परिमंडळ-२, मुंबई, श्री अनुराग जैन, मा.सहाय्यक पोलीस आयुक्त, भोईवाडा विभाग, मा. वरिष्ठ पोलिस निरीक्षक श्री. आदिनाथ गावडे, काळाचौकी पोलीस ठाणे, पोलिस निरीक्षक(गुन्हे) श्री. प्रदिप सावंत, काळाचौकी पोलीस ठाणे यांचे मार्गदर्शनात काळाचौकी पोलीस ठाणेचे सपोनि मुलाणी, सपोनि चौधरी, पोउपनि काकडे, पोह ००९२४ चन्ने, पोशिक्र १११३९६ पवार, पो.शि.क्र. १५०९९६/कुंभार, मपोशिक्र १३०९५१ गवारी यांनी केली आहे.